## पान १ वरुन

### शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसाठी शिवसैनिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

कोपरगाव, श्रीरामपूर आणि नेवासा यांसह शिर्डी लोकसभा मतदारसंघातील सात तालुयांतील कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. विशेषतः युवासेनेच्या पदांसाठी तरुणांचा मोठा प्रतिसाद पाहायला मिळाला. गेल्या पाच दिवसांपासून सचिव राम रेपाळे यांनी अहिल्यानगर दक्षिण आणि शिर्डी या दोन्ही लोकसभा मतदारसंघांतील तालुकानिहाय इच्छुकांच्या मुलाखती घेण्याची प्रक्रिया राबविली. जिल्ह्यातील जुन्या कार्यकारिणी बरखास्त करून नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याच्या निर्णयामुळे अनेक इच्छुकांनी विविध पदांसाठी आपला दावा मांडला आहे. तळागाळात काम करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांना संघटनेत संधी देणे, नव्या तरुण नेतृत्वाला पुढे आणणे आणि आगामी निवडणुकांसाठी सक्षम संघटनात्मक यंत्रणा उभी करणे हा या प्रक्रियेचा उद्देश आहे. आता मुलाखतींचा अहवाल पक्षश्रेष्ठींकडे सादर झाल्यानंतर नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांकडे जिल्ह्यातील शिवसैनिकांचे लक्ष लागले आहे.

एकंदरीत, नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक घडी नव्याने बसविण्याच्या हालचालींना वेग आला असून, जुन्या अनुभवी कार्यकर्त्यांसह नव्या दमाच्या तरुणांना कोणत्या जबाबदाऱ्या मिळतात, याची उत्सुकता राजकीय वर्तुळात आहे. शिवसेना पक्ष संघटना वाढविण्यासाठी पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तळागाळातील शिवसैनिक सातत्याने काम करत आहेत. पक्षाबद्दल असलेली निष्ठा, प्रेम, संघटनात्मक काम करण्याची क्षमता आणि सामाजिक योगदान या सर्व बाबींचा बारकाईने आढावा खासदार ज्योतीताई वाघमारे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी व राम रेपाळे यांनी दोन दिवसांच्या मुलाखतीदरम्यान घेतला. पक्षवाढीसाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या आणि संघटनेशी निष्ठा ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांना निश्चितच संधी मिळेल....

– नितीनराव औताडे, जिल्हाप्रमुख

**खेवरे यांच्यावरील गुन्ह्याने शिवसैनिकांमध्ये अस्वस्थता**

शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख पैलवान रावसाहेब खेवरे यांच्याविरोधात जिल्हाप्रमुख पदाच्या मुलाखतीच्या पूर्वसंध्येला गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. एका महिलेने केलेल्या तक्रारीत खेवरे यांच्यासह राहुरी तालुयातील दोन डॉटरांवरही आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांची सत्यता तपासातून स्पष्ट होणार आहे. शिवसेनेत सुमारे ३८ वर्षे काम केलेल्या खेवरे यांनी अलीकडेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला होता. मुलाखतीच्या अगदी आधी घडलेल्या या प्रकारामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता आहे. तक्रारदार महिलेला न्याय मिळणे आवश्यक असतानाच, आरोप सिद्ध होण्यापूर्वी कोणताही निष्कर्ष काढू नये, अशी कार्यकर्त्यांची भूमिका आहे. पक्षश्रेष्ठींनी सर्व बाजूंची वस्तुस्थिती जाणून घेऊन निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शिवसैनिक व्यक्त करत आहेत

### वैभव सूर्यवंशीचे वादळी द्विशतक!

भारत अ संघाने हे २५० धावांचे लक्ष्य अवघ्या १५ षटकांत तीन गडी गमावून पूर्ण केले. कर्णधार तिलक वर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.
आता २७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या उपांत्य फेरीत भारतासमोर बांगलादेश किंवा श्रीलंका यांच्यापैकी एका संघाचे आव्हान असेल. वैभवच्या या ऐतिहासिक खेळीमुळे भारतीय क्रिकेटच्या नव्या पिढीच्या आक्रमक सामर्थ्याची पुन्हा एकदा झलक पाहायला मिळाली.

### प्रवरेच्या तीरावर भक्तीचा जागर; काकडा सांगता सोहळ्याने धानोरे भक्तिरसात तल्लीन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव प्रतिनिधी :** हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद, दीपज्योतींचा लखलखाट आणि प्रवरा माईच्या जयघोषाने धानोरे येथील घाट परिसर अक्षरशः भक्तिरसात न्हाऊन निघाला. त्रिपुरी पौर्णिमेचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेला भव्य काकडा सांगता सोहळा अत्यंत मंगलमय आणि आध्यात्मिक वातावरणात उत्साहात संपन्न झाला. भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या सोहळ्याने ग्रामस्थांसह भाविकांना धार्मिक परंपरेचा अनोखा अनुभव दिला. धनेश्वर देवस्थान ट्रस्ट, स्वानंदी भजनी मंडळ, अंबिका भजनी मंडळ आणि समस्त धानोरे ग्रामस्थांच्या पुढाकारातून या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या काही दिवसांपासून अखंड भक्तिभावाने सुरू असलेल्या काकडा आरतीची मंगळवारी (दि. २४ नोव्हेंबर) सायंकाळी विधिवत सांगता करण्यात आली. यानिमित्त देवस्थान परिसरात मंदिरांसमोर पणत्या प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा करण्यात आला. असंख्य दीपज्योतींनी उजळलेला मंदिर परिसर आणि घाटावरील मनोहारी दृश्य भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे ठरले. या मंगलप्रसंगी काकडा आरती सांगता सोहळा, तुळशी विवाह सोहळा आणि प्रवरा माईची महाआरती धार्मिक विधी व भक्तिभावाने पार पडली. प्रवरा नदीच्या पवित्र तीरावर झालेल्या महाआरतीच्या वेळी भाविकांनी श्रद्धापूर्वक सहभाग नोंदविला. नदीच्या लाटांवर प्रतिबिंबित होणाऱ्या दीपज्योती आणि सामूहिक आरतीचा भक्तिमय निनाद यामुळे संपूर्ण परिसरात चैतन्यदायी वातावरण निर्माण झाले होते.

# शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांचा प्रश्न मार्गी लावणार; राहुरीत ७.५० कोटींचे नियोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत जाण्यासाठी कायमस्वरूपी आणि बारमाही रस्ते उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या अंमलबजावणीला राहुरी विधानसभा मतदारसंघात गती देण्यात येणार आहे. या योजनेसाठी ७ कोटी ५० लाख रुपयांचे नियोजन करण्यात आले असून, शेतरस्त्यांची प्रलंबित कामे प्राधान्याने हाती घेऊन ती वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी प्रशासनाला दिले. राहुरी तहसील कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत आमदार कर्डिले यांनी महसूल, पोलीस, कृषी, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम व ग्रामपंचायत प्रशासनाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

गावोगावी असलेल्या पारंपरिक शेतरस्त्यांचे सर्वेक्षण व सीमांकन करून त्यांना स्वतंत्र क्रमांक देणे, गाव नकाशांमध्ये नोंदी करणे, ग्रामपंचायत स्तरावर प्राधान्यक्रमानुसार रस्त्यांची यादी तयार करणे, तसेच अतिक्रमण असलेल्या रस्त्यांवरील अडथळे दूर करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करणे, अशा महत्त्वपूर्ण बाबींवर बैठकीत चर्चा झाली. आवश्यक ठिकाणी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याबरोबरच रस्त्यांची मोजणी, तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रके आणि प्रशासकीय मान्यता यांची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

केवळ कागदावर नियोजन नको, प्रत्यक्ष कामांना सुरुवात करा! असा स्पष्ट संदेश आमदार कर्डिले यांनी यावेळी दिला. प्रत्येक कामासाठी जबाबदार यंत्रणा निश्चित करून कामांचा दर्जा राखावा. कामापूर्वी आणि कामानंतरची छायाचित्रे व डिजिटल नोंदी ठेवाव्यात. तसेच शेतरस्त्यांच्या कडेला वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याचेही त्यांनी सुचविले.

सध्याची दुष्काळी परिस्थिती आणि शेतीसमोरील अडचणी लक्षात घेता शेतकऱ्यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी रस्त्यांअभावी त्रास सहन करावा लागू नये. शेतरस्त्यांवरील अतिक्रमणांबाबत निष्पक्षपणे कार्यवाही करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा. या कामांमध्ये कोणत्याही स्तरावर दिरंगाई होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही आमदार कर्डिले यांनी केले. या बैठकीस समितीचे सहअध्यक्ष वैभव खलाटे, उपविभागीय अधिकारी विनीत शिर्के, तहसीलदार डॉ. अमित पवार, पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, गटविकास अधिकारी मोहसीन शेख, तालुका कृषी अधिकारी बापूसाहेब शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सय्यद यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष विनीत धसाळ, बाबासाहेब शिंदे, उमेश शेळके, कुलदीप पवार, अनिल पवार, माजी नगरसेवक अक्षय तनपुरे, मयूर गवळी, विश्वास तनपुरे आदी उपस्थित होते.



### अवैध गुटखा विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरात शिवराई रोडला पोस्ट ऑफिस समोर अवैध रित्या गुटखा विक्री करणाऱ्या एका विरोधात वैजापूर पोलिसांनी छापा टाकत कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांच्या पथकाने ८१६० किमतीचा गुटखा जप्त केला आहे या प्रकरणात वैजापूर पोलिसात पोलिस अंमलदार अमोल कांबळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादी यांच्यासह पोलिस हेड कॉन्स्टेबल गणेश काळे पोलीस कॉन्स्टेबल डहाळे यांना गोपनीय बातमीदार मार्फत माहिती मिळाली की शहरातील शिवराई रोडला पोस्ट ऑफिस समोर साहिल स्टॉलच्या मागे इसम नामे अलीम पिता इकबाल तांबोळी (वय ३० वर्षे रा. लाडगाव रोड वैजापूर) हा प्रतिबंधित केलेल्या गुटक्या पुड्याची विक्री करत आहे. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांच्या पथकाने पंचांसह घटनास्थळी मंगळवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास छापा टाकला.यावेळी त्यांना तिथे अवैधरित्या गुटखा विक्री होत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी ८१६० रुपये किमतीचा गुटखा जप्त करत प्रकरणात अलीम इकबाल तांबोळी वय ३० वर्षे याच्या विरोधात वैजापूर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे, अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून अँड. स्नेहलताई चव्हाण यांचा वाढदिवस साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा अँड. स्नेहल चव्हाण-घाडगेपाटील यांचा वाढदिवस यंदा त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलामध्ये आगळ्यावेगळ्या पद्धतीने, विविध वृक्षांची लागवड करून तसेच विद्यार्थ्यांना पुस्तके वाटून विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

तसेच वड, पिंपळ, आंबा, जांभूळ, कडुनिंब अशा देशी आणि औषधी वृक्षांची लागवड केली. यावेळी अँड. स्नेहल चव्हाण-घाडगेपाटील म्हणाल्या, ''झाडं लावणं हाच खरा वाढदिवसाचा आनंद आहे. आज लावलेलं एक झाड उद्या अनेकांना सावली, ऑक्सिजन आणि फळं देईल. प्रत्येकाने आपल्या वाढदिवसाला किमान एक झाड लावावं.''असे आवाहन केले.या उपक्रमात लहान मुलांपासून सर्वांनी सहभाग घेतला. लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन आणि संरक्षण करण्याची जबाबदारीही उपस्थितांनी घेतली.



कार्यक्रम प्रसंगी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे विश्वस्त शरद घाडगेपाटील, संस्थेचे कार्यकारी अधिकारी डॉ.गौरव आमलेपाटील, त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चांगदेव आरसुळे, प्राचार्य सोपान काळे, दिपाली बाविस्कर, प्रशिल जोसेफ, निवासी प्राचार्य एकनाथ कापसे, उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे, दत्तात्रय वांढेकर, डॉ.अनुराधा गोरे,अनिता जाधव,जयश्री भवर, शेवगावचे मानद विश्वस्त बाळासाहेब कोकरे,प्राचार्य भोईटे, शिवाजीराव काटे सर्व विभागाचे विभाग प्रमुख शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणीभूषण प्रा.अशोक गाडे यांनी केले.

### ऊसदर आंदोलनप्रकरणी १७ जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** ऊसदरवाढीच्या मागणीसाठी महागाव (ता. वैजापूर) येथील पंचगंगा साखर कारखान्यासमोर रविवारी (दि. २३) करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलनप्रकरणी विरगाव पोलिसांनी १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कोल्हापूरप्रमाणे ऊसाला प्रतिटन ४२०० रुपये भाव मिळावा, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी वैजापूर-गंगापूर महामार्गावर पंचगंगा साखर कारखान्यासमोर रास्ता रोको आंदोलन केले होते. दुपारी १२.३० ते ३.४० वाजेपर्यंत हे आंदोलन सुरू होते. यावेळी आंदोलकांनी महामार्गाच्या दोन्ही बाजूंच्या वाहतुकीस अडथळा निर्माण करून रस्ता अडविल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.
या प्रकरणी पोलीस कर्मचारी सतीश भरत गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अजय पाटील साळुंके (रा. शिऊर), चंद्रशेखर साळुंके, संतोष सहानघोरे, अजय मोटे, बाळासाहेब जानराव, प्रकाश ठुबे, दिनकर राजाराम दुशिंग (रा. जातेगाव) यांच्यासह अन्य १० ते १२ अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी २१ नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन करून तसेच कोणतीही पूर्वपरवानगी न घेता महामार्गावरील दोन्ही लेनची वाहतूक रोखल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र पोलीस कायदा आणि राष्ट्रीय महामार्ग कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल कुलकर्णी करीत आहेत.

## पठारे हत्याकांड ; रस्ता रोको प्रकरणी आंदोलकांवर गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** रोहित पठारे हत्याकांड प्रकरणात न्याय मिळावा, या मागणीसाठी समृद्धी महामार्गावर करण्यात आलेले रास्ता रोको आंदोलन आंदोलकांना चांगलेच भोवले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून महामार्गावर ठिय्या देत वाहतूक अडविल्याप्रकरणी दहा जणांसह अन्य पाच ते दहा अनोळखी व्यक्तींविरुद्ध वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अंमलदार ज्ञानेश्वर मेटे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीनुसार, २२ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला. रोहित पठारे यांच्या मृत्यूप्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. दरम्यान, रोहितला न्याय मिळवून देण्यासाठी समृद्धी महामार्गावर रास्ता रोको करण्याचे आवाहन काही कार्यकर्त्यांकडून सोशल मीडियासह विविध माध्यमांतून करण्यात येत होते.

या आंदोलनाची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी २१ नोव्हेंबर रोजी संबंधित कार्यकर्त्यांना प्रतिबंधात्मक नोटिसा बजावल्या होत्या. तसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी बैठका घेऊन आंदोलन न करण्याचे आवाहन केले होते. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजताही आंदोलकांना जमावबंदी आदेशाची माहिती देत मागण्या कायदेशीर व संविधानिक मार्गाने मांडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.मात्र, या सूचनांकडे दुर्लक्ष करून अंकुश ऊर्फ भय्या पठारे, सिद्धार्थ बागूल, सचिन बागूल, जाकीर पठाण, कार्तोक बोर्डे, शाम साळुंके, अमोल शिंदे, शाक्यसिंह त्रिभुवन, सफल ऊर्फ बॉबी त्रिभुवन आणि विशाल पवार यांच्यासह अन्य पाच ते दहा जणांनी सटाणा रोडने पायी जात समृद्धी महामार्गावरील शिर्डी ते नागपूर मार्गावरील चॅनल क्रमांक ४८८ येथे प्रवेश केला.विशेष म्हणजे, अधिकृत प्रवेशडराचा वापर न करता महामार्गाच्या बाजूला असलेल्या तारेच्या कुंपणावरून अनधिकृतपणे महामार्गावर प्रवेश केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यानंतर आंदोलकांनी महामार्गावरच ठिय्या देत वाहनांची वाहतूक रोखली. पोलिसांनी वारंवार हटण्याच्या सूचना करूनही आंदोलकांनी त्याकडे दुर्लक्ष केले. परिणामी दुपारी १२.३० ते १२.४५ या पंधरा मिनिटांच्या काळात वाहतूक ठप्प झाली. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. या घटनेचे चित्रीकरण पोलिसांनी केले असून, आंदोलकांमुळे महामार्गावरील पोलिसांच्या पेट्रोलिंग वाहनाच्या कामकाजातही अडथळा निर्माण झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी दहा नामनिर्देशित व्यक्तींसह अन्य पाच ते दहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमे तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निधनवार्ता

### अरुण करीर



**श्रीरामपूर :** शक्ती बॅटरीचे मालक अरुण रामनिरंजनदास करीर (वय ७८) यांचे मंगळवार, दि. २४ रोजी अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक बहिण, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे मअसा परिवार आहे. ते कौशल व अजित करीर यांचे थोरले बंधू, विशाल व आनंद करीर यांचे वडील, अनुप धुस्सा यांचे सासरे होते.

### सुखदेव खाटेकर




**राहुरी :** तालुक्यातील तांदुळवाडी येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचे माजी चेअरमन सुखदेव हरिभाऊ खाटेकर (वय ६०) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे. मोहनराव, अण्णासाहेब, एकनाथ, व उत्तम खाटेकर यांचे बंधू तर धार्मिक क्षेत्रात नावलौकिक मिळविलेले युवा कीर्तनकार हभप महेश महाराज खाटेकर यांचे वडील होत.

### जयेंद्र काले



**श्रीरामपूर :** वर्धमान ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन, संकेत नर्सरीचे संचालक जयेंद्र विजयचंद काले (वय ६४) यांचे आज दुपारी हृदयविकाराने दुःखद निधन झाले. वर्धमान पतसंस्था गणेशनगरचे संस्थापक चेअरमन राजकुमार काले यांचे पुतणे होत.

### शेखर पाठक



**श्रीरामपूर :** शहरातील वॉर्ड नं. १ आदर्शनगर मधील तत्कालीन पाठक क्लासेसचे संचालक शेखर भरत पाठक (वय ६७) यांचे सोमवार, दि. २३ रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते श्रीरामपूर न. प. बचत गटाच्या समूह संघटीका अधिकारी वर्षा पाठक यांचे पती, बँक ऑफ बडोदाचे वसुली अधिकारी शंतनू पाठक यांचे ते वडील होते.

## अभाम पत्रकार परिषदेच्या तालुकाध्यक्षपदी भुजाडी, उपाध्यक्षपदी मकासरे,समर्थ वाकचौरे

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राहुरी तालुकाध्यक्षपदी सुनिल भुजाडी,उपाध्यक्षपदी प्रभाकर मकासरे व समर्थ वाकचौरे , सचिवपदी राजेंद्र परदेशी,खजिनदारपदी अशिष संसारे,संघटकपदी रमेश खेमनर, कार्याध्यपदी श्रीकांत जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. तर मावळते अध्यक्ष रफीक शेख यांना जिल्हा कार्यकारिणी वर संधी देण्यात आली असल्याचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष अमोल वैद्य यांनी सांगितले.

पत्रकार हल्ला कृती समितीचे उत्तर नगर जिल्हा समन्वयक राजेंद्र उंडे, जिल्हा कोषाध्यक्ष रियाजभाई शेख,जिल्हा कार्याकारिणी सदस्य आकाश येवले,यांच्या प्रमुख उपस्थितीत मावळते अध्यक्ष रफीक शेख यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेच्या राहुरी तालुका नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली.

मराठी पत्रकार परिषदेचे सल्लागार व मार्गदर्शक निसार सय्यद,संजय कुलकर्णी,सुधाकर कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली



राहुरी तालुकाध्यक्षपदी सुनिल भुजाडी,उपाध्यक्षपदी प्रभाकर मकासरे व समर्थ वाकचौरे, सचिवपदी राजेंद्र परदेशी, कार्याध्यपदी श्रीकांत जाधव, खजिनदारपदी अशिष संसारे,संघटकपदी रमेश खेमनर,प्रसिद्धी प्रमुख जालिंदर ढोकणे, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या नूतन कार्यकारिणीत सदस्य म्हणुन रफीक शेख,रियाज देशमुख,बाळासाहेब दातीर,समीर शेख,बंडू म्हसे,आकाश येवले,शक्कुरभाई तांबोळी,नानासाहेब उंडे,जालिंदर अल्हाट,सुरेश तरकसे,राजेंद्र आढाव, मनिष पटेकर, शरद पाचारणे,मनोज साळवे,सुभाष आग्रे,महेश कासार आदींचा समावेश करण्यात आला आहे. नूतन पदाधिकारी कार्यकारीणीचे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष गोपी लांडगे, प्रदेश प्रतिनिधी सुनिल नवले, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे,उत्तर नगर जिल्हाध्यक्ष अमोल वैद्य, सरचिटणीस रोहित टेके,जिल्हा उपाध्यक्ष दिलीप खरात,सोमनाथ कचरे व रवी भागवत, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रकाश आरोटे, दक्षिण जिल्हाध्यक्ष सूर्यकांत नेटके,पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे उत्तर जिल्हा जिल्हा निमंत्रक गुरुप्रसाद देशपांडे,जिल्हा समन्वयक राजेंद्र उंडे,डिजिटल मीडियाचे जिल्हाध्यक्ष आफताब शेख यांच्यासह सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

---

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि. २५ नोव्हेंबर २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१३७ ३८० ३३५ — १-० — १३० २८० ४६० — १२-९०-७४-८५-०६

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

१२० ६७० ३३७ — ३-९ — १८० २८९ ३८८ — ३१-७९-२५-०८-९४

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

२३५ ३७० ४६० — ०-३ — १२० १७० ३०० — ०६-४३-९२-७१-३५

| माधुरी बाजार डे | माधुरी बाजार नाईट |
|---|---|
| १२४ | १५६ |
| ७८ | २१ |
| ३५० | २३६ |

dpbosssss.live

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |
| 21/09/2026 to 25/09/2026 | 390 25 348 | 457 62 129 | 480 23 599 | 166 30 479 | 150 60 280 |
| 28/09/2026 to 02/10/2026 | 669 19 135 | 137 18 279 | 260 84 257 | 660 29 126 | 369 84 770 |
| 05/10/2026 to 09/10/2026 | 140 57 250 | 459 85 168 | 130 48 567 | 469 99 126 | 558 84 590 |
| 12/10/2026 to 16/10/2026 | 160 79 568 | 290 11 669 | 122 58 189 | 130 46 123 | 257 42 480 |

## माधुरी बाजार डे / नाईट

३४७ ६८० १४९ — ४-९ — ५७९ ४८९ २३६ — ४९-५२-६८-७२-९५

४-६-९

Mydpboss.com